परिवर्तनाचा
# वाटसरू

वर्ष २१वे / अंक २१वा / किं. २५ रु. / १ ते १५ मार्च २०२२

**संस्थापक संपादक**
अभय कांता*

**संपादक**
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**
प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**सहव्यवस्थापक**
प्रकाश वाघमारे

**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014
Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

# अ
# नु
# क्र
# म


**समसामायिक**

**हिजाबवरून रणकंदन** ५
कलीम अजीम

**प्रश्न हिजाबचा की हिंदुत्वाचा?** ११
सुहास पळशीकर

**'उदारमतवादी' सापळ्यात** १४
प्रताप भानू मेहता

**विधी वि. न्याय?** १७
जयदेव डोळे

**विशेष मुलाखत**

**कामगार चळवळीला सकारात्मक भविष्य..** २१



र. ग. कर्णिक मुलाखतकार संतोष गांगुर्डे

**नाट्यचर्चा**

**'प्रत्यय'कारी अभिवाचन** ३०
अनमोल कोठडिया

**अभ्यास**

**डॉ. आंबेडकर आणि धर्मांतर – भाग १** ३३
चैतन सोनावले

**निमित्ताने**

**बाळ ठाकूर : निधनाच्या बातम्यांमधलं 'राष्ट्र'** ३८
अवधूत डोंगरे

**आदरांजली**

**बप्पीदा : डिस्को संगीताचे भारतीय भाष्यकार** ४२
प्रवीण घोडेस्वार

**आपण हे वाचलंय का?**

**लाईफ इज एल्सव्हेअर** ४५
सत्येन होंबाळी

**कविता**

प्रमोदकुमार अणेराव ४८


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# बप्पीदा : डिस्को संगीताचे भारतीय भाष्यकार

प्रवीण घोडेस्वार

चित्रपटाला संगीत देऊन आपल्या कारकिर्दीचा प्रारंभ केला. १९७५मधल्या 'जख्मी' चित्रपटातली त्यांनी संगीतबद्ध केलेली 'जलता है जिया मेरा भिगी भिगी रातो में...' हे किशोर-आशाचं धुंद युगल गीत, लताचे 'अभी अभी थी दुष्मनी...' हे सोलो गाणे, 'आओ तुम्हे चांद पे ले जाए...' हे लता-सुषमा श्रेष्ठ यांनी गायलेले बालगीत, ही गाणी बऱ्यापैकी लोकप्रिय झाली. याच चित्रपटात मोहम्मद रफी नि किशोरकुमार या दोन दिग्गजांकडून त्यांनी एक गाणे गाऊन घेतले. १९७६च्या 'चलते चलते' मधले किशोरदाच्या आवाजातले शीर्षक गीत तर किशोरचे 'ऑल टाइम हिट' या श्रेणीत येते. शिवाय लता - शैलेन्द्रसिंह यांचे 'प्यार में कभी कभी ऐसा हो जाता है...' खणकदार युगल गीतही श्रोत्यांनी उचलून धरले. १९७७मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आप की खातीर' या चित्रपटातले 'बम्बई से आया मेरा दोस्त, दोस्त को सलाम करो...' हे त्यांनीच गायलेले आणि संगीत दिलेले गीत तुफान लोकप्रिय झाले. १९७८ साली आलेल्या 'टूटे खिलौने' चित्रपटात 'माना हो तुम बेहद हसी...' हे गायक येसुदासचे अप्रतिम नि अविस्मरणीय गाणे त्यांनी दिले.

१९७९मधल्या 'सुरक्षा' चित्रपटात त्यांनी 'मौसम है गाने का...' हे गाणे स्वरबद्ध करून पहिल्यांदा आपल्या डिस्को संगीताचा आविष्कार श्रोत्यांना घडवला. १९८०मधल्या 'प्यारा दुष्मन' या चित्रपटात गायिका उषा उथुपने गायलेल्या 'हरी ओम हरी...' या डिस्को गाण्याने त्यांची वेगळी ओळख प्रस्थापित झाली. हीच शैली पुढे कायम ठेवून त्यांनी 'अरमान' (१९८१) रम्बा हो हो संबा हो हो... (उषा उथुप) आणि हा मेरी जैसी हसीना का दिल... (शेरॉन प्रभाकर- बप्पीदा) ही दोन ट्रेंडसेटर डिस्को गाणी दिलीत. याच वर्षी आलेल्या 'वारदात' या चित्रपटात पुन्हा एकदा बप्पीदाने डिस्को संगीताचा नजराणा पेश केला. मग १९८२मध्ये आला 'डिस्को डान्सर'. यातली 'आय ॲम ए डिस्को डान्सर...' (विजय बेनेडिक्ट), 'जिमी जिमी जिमी आजा आजा...' (पार्वती खान), 'कोई यहा नाचे नाचे...' (उषा उथुप- बप्पीदा), 'याद आ रहा है तेरा प्यार...' (बप्पीदा), 'कृष्णा धरती

---

लेखक नाशिकस्थित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे प्रभारी संचालक असून चित्रपट संगीताचे अभ्यासक आहेत.
ईमेल - gpraveen18feb@gmail.com

हा चित्रपट १९८३मध्ये प्रदर्शित झाला नि बप्पीदाच्या संगीतकार म्हणून कारकीर्दीची गाडी सुसाट वेगाने धाऊ लागली. 'ताकी ओ ताकी...', 'नैनो में सपना सपनोमें सजना...', 'वाह वाह खेल शुरू हो गया...', 'लडकी नही तू लकडी का खंबा है...' ही गाणी गल्ली-बोळात जाऊन पोहचली. गीतकार इंदीवर आणि संगीतकार बप्पी लाहिरी या जोडीने अक्षरशः धुमाकूळ घातला. इंदीवर यांची दुसरी इनिंग झोकात सुरू झाली. 'कोई जब तुम्हारा हृदय तोड दे...' यासारखी काव्यमय गाणी लिहिणाऱ्या या कविराजने 'धक्कम धक्का हुआ प्यार बडा पक्का हुआ...', 'झ झ झ झोपडी में च च च चारपाई...' अशा गाण्यांचा कारखानाच उघडला! पडद्यावर जितेंद्रने श्रीदेवी-जयाप्रदा सोबत टिपिकल दाक्षिणात्य मेलोड्रामाची प्रेक्षकांवर मोहिनी घातली. यानंतर 'मवाली', 'जस्टीस चौधरी', 'तोहफा', 'मकसद', 'नया कदम', 'नौकर बिवी का', 'मास्टरजी', 'हैसियत', 'कामयाब' अशा 'मेड इन साऊथ' चित्रपटांची लाटच आली. यातली बहुतांशी गाणी अर्थहीन असूनही ठेका धरायला लावणारी असल्याने लोकप्रिय झाली.

राजश्री प्रोडक्शनच्या 'मैने प्यार किया' (१९८९)ची गाणी (संगीतकार- रामलक्ष्मण) तुफान लोकप्रिय झाली. मग बप्पी यांनी लता आणि एस. पी. बालसुब्रम्हण्यम यांच्याकडून 'फर्स्ट लव्ह लेटर' या सिनेमात याच शैलीतली प्रेमगीते गाऊन घेतली. एका लोकप्रिय आफ्रिकन गाण्यावर बेतलेलं त्यांचे 'तम्मा तम्मा लोगे' (चित्रपट- थानेदार) हे गाणेदेखील गाजले. याच चालीवर लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी 'चुम्मा चुम्मा दे दे...' (चित्रपट- हम) हे गाणे बनवले. गायक सुदेश नव्या दमाच्या संगीतकारांचे आगमन झाले. ह्या नव्या आणि राजेश रोशन, अन्नू मलिक या समकालीनांच्या स्पर्धेतही ते टिकून राहिले. लोकांना जे संगीत आवडते तसे संगीत द्यायचा त्यांचा नेहमी प्रयत्न असायचा. 'दलाल' (१९९३) या चित्रपटातली त्यांची गाणी गाजली. 'ठहरे हुए पानी में...' (साधना सरगम/ कुमार सानू), 'चोरी चोरी मैने भी तो...' (कविता कृष्णमूर्ती-कुमार सानू) ही त्यांनी नदीम-श्रवणच्या शैलीत बांधलेली गाणी लोकांना आवडली. याशिवाय यातले 'चढ गया उपर रे अटरिया पे लोटन कबुतर रे...' (इला अरुण-कुमार सानू- बप्पीदा-अलका याज्ञिक) हे लोकसंगीताच्या बाजाचे गाणेही बऱ्यापैकी गाजले. १९९६मधल्या 'हम सब चोर है' या चित्रपटात त्यांनी 'सावली सलोनी तेरी झील सी आंखे...' (कुमार सानू- अलका याज्ञिक) हे नितांत सुरेल युगल गीत दिले. बप्पी लाहीरींनी मिथुन चक्रवर्तीसाठी (सुरक्षा, डिस्को डान्सर, कसम पैदा करनेवाले की, दलाल, वारदात, डान्स डान्स, मुद्दत, प्रेम प्रतिज्ञा वगैरे) केलेली गाणी जास्त गाजली. नंतर अभिनेता गोविंदाही सुरुवातीला त्यांच्याच संगीताच्या तालावर पडद्यावर थिरकला.

प्रख्यात निर्माते-दिग्दर्शक प्रकाश मेहरांच्या 'नमक हलाल' आणि 'शराबी' या दोन चित्रपटात बप्पीदाने वैविध्यपूर्ण गाणी दिली. जाणकारांच्या मते मेहरांनी त्यांना कल्याणजी-आनंदजीच्या शैलीत संगीत द्यायला सांगितले होते. असे असले तरी त्यांनी यातल्या संगीतावर आपली छाप उमटवली. 'पग घुंगरू बांध मीरा नाची थी...'/ 'जवानी जानेमन हसीन दिलरुबा...'/ 'रात

नजर को तेरा इंतजार... आणि 'आवाज दी है... (आशा भोसले- भूपेंद्र ) ही दोन 'क्लासिक' गाणी त्यांनी दिली. १९८६मध्ये त्यांनी ३३ चित्रपटांसाठी तब्बल १८० गाण्यांना संगीत देण्याच्या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. १९९०मधल्या 'डोक्याला ताप नाही' या मराठी चित्रपटाला त्यांनी संगीत देऊन गायनही केले.

राहुल देव बर्मन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, कल्याणजी-आनंदजी यासारखे दिग्गज संगीतकार कार्यरत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्यावर उचलेगिरीचा अनेकदा आरोप करण्यात आला. पण तरीही त्यांनी दिलेले संगीत मोडीत काढता येणारे नाही. गायक म्हणूनही त्यांची कामगिरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्यामुळे हिंदी चित्रपट संगीताच्या चाहत्यांना उषा उथुप, शेरॉन प्रभाकर, अलिशा चिनॉय, विजय, एस. जानकी या गायकांचा परिचय झाला. त्यांनी सर्व आघाडीच्या आणि नवोदित गायकांना संधी दिली. उषा मंगेशकर, सुरेश वाडकर यांच्याकडूनही गाणी गाऊन घेतली. 'डान्स डान्स' चित्रपटात त्यांनी उत्तरा केळकरला संधी दिली. आनंद शिंदे यांच्या गाजलेल्या 'नवीन पोपट हा...' या गाण्याचा हिंदी आविष्कार त्यांनी 'मेरा दिल तोता बन जाए...' (चित्रपट- पाप की दुनिया) या युगल गीतातून श्रोत्यांना घडवला. आताच्या पिढीला ते 'बॉम्बईया नगरिया' ( टॅक्सीनंबर ९२११), 'ओह लाला ओ लाला' (डर्टी पिक्चर), 'तुने मारी एन्ट्री' (गुंडे ), 'भंकस' (बागी ३) यासारखी त्यांनी नवीन संगीतकारांकडे गायलेल्या गाण्यांमुळे परिचित झाले. त्यांच्यावर हॉलीवूड गायक एल्विस

वेगळी इमेज होती. बप्पीदांनी त्या इमेजचा अक्षरशः भूगा केला. 'कसम पैदा करनेवाले की'मधले तिचे 'ये रात में जो मजा है...' हे गाणे केवळ अद्भुत होते. आशा भोसलेंच्या साम्राज्याला ह्या गाण्याने तडा गेला आणि आशा भोसलेंपेक्षाही वेगळ्या आवाजात हस्कीपणा निर्माण करता येतो, हे बप्पीदांनी व सलमा आगाने सिद्ध केले. (ह्या गाण्याचे जलवा ४ व्हर्जन्स ऐकावेत म्हणजे सलमा आगाच्या आवाजाची किंमत कळते. शमशाद बेगम स्कूलचा हा आवाज म्हणजे एक नवे व्हर्जन होते आणि ते बप्पीदांनी निर्माण केले होते. दुर्दैवाने सलमा आगा नंतर मुस्लीम परंपरेत परतली आणि अशी गाणी गाणे तिने बंद केले.) बप्पीदाला क्लासिकल दर्जा मिळाला नाही पण डिस्को संगीताचे त्यांनी अफलातून भारतीयकरण केलं. इलायाराजाने अॅसेंडिंग नोट्स निर्माण करून त्यात जी क्रांती निर्माण केली तशी बप्पीदाला जमली नाही. आज बप्पीदाने जे केले त्याचे मूल्यमापन करणे जड जाते. कारण त्यांचे कोणते गाणे चोरलेले निघेल सांगता येत नाही. एक गोष्ट नक्की त्यांनी आमच्या कुमार वयात एक वेगळा नृत्यप्रधान साऊंड दिला आणि आम्हाला मनसोक्त नाचू दिले!'' तिळवे यांनी बप्पी लाहिरी यांच्या सांगीतिक कामगिरी आणि योगदानाचे केलेले विश्लेषण अचूक आहे.

१९७०नंतर जन्मलेल्या नि आज पन्नाशीत असलेल्या पिढीच्या बालपणाच्या भावविश्वात रुजून राहिलेल्या बप्पी लाहिरी नामक डिस्कोच्या बादशहाला भावपूर्ण श्रद्धांजली!

●